बीड । रविवार
१८.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ४७
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955





## बीड प्रकरणाला जातीय वळण देऊ नका, सर्व आरोपी वेगवेगळ्या समाजाचे; SP नवनीत कॉँवत यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण ताजे असतानाच आता बीडमध्ये आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका तरुणाचे अपहरण करून त्याला बेदम मरहाण करण्यात आली आहे. या घटनेमुळे बीड जिल्हा पुन्हा एकदा हादरून गेला. या घटनेचा भयानक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या घटनेने राज्यभर संतापाची लाट उसळली असून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी भारताने ज्या प्रकारे पाकिस्तान विरोधात ऑपरेशन सिंदूर सीमेवर केले होते. तसेच महाराष्ट्राच्या बीडमध्ये देखील केले पाहिजे, अशी मागणी केली आहे. त्यानंतर आता



### काय म्हणाले पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत ?

**नवनीत कॉवत म्हणाले, परळी तालुक्यातील टोकवाडी परिसरात झालेली मारहाण ही तत्कालिक कारणातून झाली आहे. या प्रकरणाला कुठलाही जातीय रंग देण्याचा प्रयत्न कोणीही करू नये. असे आवाहन बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत यांनी केले आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला असून सात आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत यांनी परळी तालुक्यातील टोकवाडी परिसरात झालेल्या या मारहाणीला जातीय रंग न देण्याचे आवाहन केलं आहे. हे सर्व आरोपी वेगवेगळ्या समाजाचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केलं आहे. यातील दोन आरोपी अल्पवयीन असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत यांनी दिली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये वेगवेगळ्या समाजाचे मुलं आहेत. हे प्रकरण तात्कालीन असून यामागे जातीय कारण नसल्याचं पोलीस अधीक्षकांनी सांगितलं. हे प्रकरण गंभीर आहे. आरोपींवर कठोर व गंभीर गुन्ह्यांची नोंद आम्ही केली आहे. यात सखोल तपास होईल असे आश्वासनही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिले आहे.

## परळी मारहाण प्रकरणात लागणार मकोका? अजित पवारांचे स्पष्ट निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कठीण प्रसंगात बीड जिल्ह्याचं पालकमंत्रीपद स्वीकारावं लागलेलं होतं. निदान त्यांच्यामुळे तरी बीडची कायदा–सुव्यवस्था सुधारेल, प्रशासन उत्तम काम करेल, असं वाटत होतं.



परंतु तसं होताना दिसत नाही. बीडमध्ये गुन्हेगारीच्या घटना वाढतच आहेत. राज्याला हादरवून सोडणारी आणखी एक घटना परळीमध्ये घडली आहे. दहा ते बारा जणांच्या गुंडांच्या टोळीने शिवराज दिवटे या तरुणाला बेदम मारहाण केली. लोखंडी रॉड, काठ्या, कती बेल्ट जे मिळेल त्याने मारहाण करण्यात आली. मारहाणीचा व्हिडीओ एवढा भीषण आहे की कुणालाही जबर धक्का बसू शकतो. अतिशय अमानुष मारहाण झाली असून जखमी शिवराजवर अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मारहाणीचा व्हिडीओ पाहून अजित पवारांनाही धक्का बसला. त्यांनी तातडीने बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याशी संपर्क साधून आरोपींवर योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले. एखाद्या प्राण्यालाही कुणी एवढ्या वाईट पद्धतीने मारणार नाही, तशी ही मारहाण झाल्याचं पालकमंत्री पवार म्हणाले.

अजित पवार म्हणाले की, मारहाणीचा व्हिडीओ बघवत नाही. एखाद्या प्राण्यालाही कुणी एवढं

▶▶ उर्वरित पान २ वर

## '...म्हणून संजय राऊतांना अटक झाली'

### शरद पवारांनी सांगितले 'ईडी कारवाई'चे राजकारण!

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार आणि सामनाचे संपादक संजय राऊत लिखित नरकातला स्वर्ग या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मुंबईमध्ये पार पडला. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार, उद्धव ठाकरे, लेखक जावेद अख्तर आदी मान्यवर या प्रकाशन सोहळ्याला उपस्थित होते. यावेळी बोलताना शरद पवार यांनी संजय राऊत यांच्या या पुस्तकाचे



कौतुक करत विरोधकांवर निशाणा साधला. संजय राऊत नेहमीच सामनामध्ये रोखठोक भूमिका मांडतात. ती त्यांची लेखणी काही लोकांना पटत नव्हती. ते अस्वस्थ होते, संधीची वाट पाहत होते, त्यांना संधी दिली ती पत्राचाळ प्रकरणाने. महाराष्ट्रात काही लोक चुकीचे काम करत असताना त्यांच्यावर कारवाई होत नव्हती. म्हणून संजय राऊतांनी केंद्र सरकारला पत्र लिहले. कारवाई झाली नाही पण त्यांना आत जावे लागले, असे शरद पवार म्हणाले.

तसेच हे पुस्तक वाचल्यानंतर जेलमधली खरी स्थिती समजते. एकनाथ खडसेंचे जावई इंग्लडमध्ये होते. खडसेंवर तक्रार झाली आणि त्यांना त्रास होईल असं कळल्यानंतर ते इथे आले. त्यांना तात्काळ ईडीने अटक केली. त्यांचा काहीही संबंध नव्हता. अनेक लोक त्याठिकाणी होते. अनिल देशमुखांवरही एका शासकीय अधिकाऱ्याने तक्रार केली की ह्यांनी १०० कोटींचा

▶▶ उर्वरित पान २ वर

## पेट्रोल पंपावरुन तरुणाचं अपहरण, डोंगरपट्ट्यात नेऊन लाठ्याकाठ्या- बेल्टने अमानुष मारहाण



**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण ताजे असतानाच बीडमध्ये आणखी एका तरुणाने अपहरण करून त्याला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बीडच्या परळीमध्ये तरुणाचे पेट्रोल पंपावरून अपहरण केले. नंतर त्याला लाठ्याकाठ्याने आणि बेल्टने अमानुष मारहाण

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये चोरट्यांनी सोन्याचे कानातले हिसकावून घेताना महिलेचा कानच तुटला

**बीड । प्रतिनिधी**

बीड बसस्थानकामध्ये रात्रीच्या सुमारास चोरट्यांकडून एका वृद्ध महिलेच्या कानातील सोने हिसकावून घेताना चक्क कान तुटल्याने महिला जखमी झाली आहे. नागाबाई मंजुळे (वय ६०) असे महिलेचे नाव आहे. चोरी, लुटमार आणि पाकीटमारीचे प्रकार वाढल्यामुळे बसस्थानकातील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शुक्रवारी रात्री नऊ वाजता ही घटना घडली.

समोर आलेल्या माहितीनुसार, नागाबाई मंजुळे बसने मेहकरहून लातूरला निघाल्या



होत्या. त्या बीड बसस्थानकात स्वच्छतागृहाकडे जात असताना चोरट्यांनी त्यांच्या कानातले ओढून पळवले. या घटनेवेळी चोरट्यांनी नागाबाई यांच्या कानातील सोन्याचे झुंबर जोरदार झटका देऊन पळवले. या जोरदार झटक्यामुळे नागाबाई मंजुळे यांच्या कानाची पाळी फाटली आणि त्यामधून रक्त वाहू लागले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे नागाबाई यांना मोठा मानसिक धक्का बसला.

आजुबाजूचे नागरिक त्यांची विचारपूस करत होते. मात्र, भांबावून गेलेल्या नागाबाई यांना उत्तरही देता येत नव्हते. त्यांचा कान फाटल्यामुळे त्याच्यातून रक्तस्राव सुरू होता. वाढत्या चोऱ्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन

▶▶ उर्वरित पान २ वर

## दोन हजारांची लाच घेताना तीन आरटीओ अधिकारी जाळ्यात

**यवतमाळ । प्रतिनिधी**

आरटीओ खात्यातील अधिकारी लाखोंची लाच घेताना अटक अशा अनेक बातम्या आतापर्यंत ऐकण्यात येत आल्या असतील. पण यवतमाळमध्ये लाचेचा एक वेगळाच किस्सा घडला. फक्त दोन हजारांची लाच घेताना आरटीओ खात्याचे तीन अधिकारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात सापडले आहेत. शिकाऊ आणि कायम स्वरुपाचे लायसन्स देण्याच्या बदल्यात एजंटच्या माध्यमातून दोन हजारांची लाच या अधिकाऱ्यांनी घेतली. सुरज गोपाल बाहीते, मयुर सुधाकर मेहकरे, बिभिषण शिवाजी जाधव असे लाचखोर सहाय्यक मोटार वाहन ▶▶ उर्वरित पान २ वर

## ईडीकडून अटक होण्याआधी संजय राऊतांना एकनाथ शिंदेचा फोन

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधत एक खळबळजनक विधान केलं आहे. ईडीकडून अटक होण्याआधी एकनाथ शिंदे यांचा मला फोन आला होता. मी वरती बोलू का?, गृहमंत्री अमित शाह यांना बोलू का?, असं एकनाथ शिंदे मला फोन करुन म्हणाले. यावर काहीच गरज नाही. तुम्ही माझ्याबद्दल वरती बोललात तरी मी तुमच्या पक्षात येणार नाही, असं संजय राऊत एकनाथ शिंदेंना म्हणाले, असा गौप्यस्फोट स्वत: संजय राऊतांनी आज माध्यमांशी बोलताना केला. संजय राऊतांचं आज नरकातला




स्वर्ग या पुस्तकाचं प्रकाशन आहे. या पुस्तकात देखील संजय राऊतांनी अनेक खळबळजनक दावे केले आहेत.

संजय राऊत आणि एकनाथ शिंदेंमध्ये नेमकं काय बोलणं झालेलं?

ईडीकडून अटक होण्याआधी मला एकनाथ शिंदेंचाही फोन आला होता, असा दावा संजय राऊत यांनी केला. एकनाथ शिंदेंनी मला फोन करुन मी वरती बोलू का?, अमित शाह यांना सांगू का? असं विचारले. यावर नको, काही गरज नाही, असं मी म्हणालो, असं संजय राऊत म्हणाले. तसेच तुम्ही वरती बोलल्यानंतरही मी तुमच्या पक्षात येणार नाही, असं संजय राऊत एकनाथ शिंदेंना म्हणाले.

अटकेआधी मी अमित शाह यांना फोन केलेला– संजय राऊत

माझ्या अटकेआधी मी शहा यांना फोन केला होता, कारण ते गृहमंत्री होते. रात्री ११ वाजता अमित शाह यांना कॉल केला होता ते कामात होते. ४–५ मिनिटांनी त्यांचा ▶▶ उर्वरित पान २ वर

## विशिष्ट नमुन्यात जात प्रमाणपत्र नसेल तर नोकरभरतीत आरक्षण नाही; सुप्रीम कोर्टाचा महत्त्वपूर्ण निकाल

**नवी दिल्ली**

सरकारी नोकरभरतीतील आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. नोकरभरतीच्या जाहिरातींतर्गत अर्ज करताना जात प्रमाणपत्र विशिष्ट नमुन्यातच सादर करणे आवश्यक आहे. जात प्रमाणपत्र नमूद केलेल्या विशिष्ट नमुन्यात सादर केले नसेल तर उमेदवार आरक्षणाचा दावा करू शकत नाही, असे न्यायालयाने आपल्या आदेशपत्रात म्हटले आहे.

न्यायमूर्ती दिपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. उमेदवार केवळ विशिष्ट प्रवर्गातील आहे. या आधारावर सरकार नोकरभरतीतील आवश्यक बाबींपासून सूट मागू शकत नाही, असे मत नोंदवत खंडपीठाने ओबीसी प्रवर्गातील उमेदवाराला दिलासा देण्यास स्पष्ट नकार दिला.

▶▶ उर्वरित पान २ वर





# तुरुंगात असतानाही त्यावेळी राज्यपालांविरोधातील लेख कसा आला? जेलर हैराण; राऊतांनी केला खुलासा!



शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या 'नरकातला स्वर्ग' पुस्तकाचे अनावरण नुकतेच झाले. यावेळी त्यांनी तुरुंगातील आठवणी आणि पुस्तकाच्या प्रक्रियेवर भाष्य केले. यावेळी जावेद अख्तर, शरद पवार, साकेत गोखले असे मान्यवर उपस्थित होते. जिथे चुकीचं काही होतं तिथे जावेदसाहेब आवाज उठवत असतात. शरद पवारांशिवाय हा कार्यक्रम होऊच शकत नाही. ते पडद्यामागे आमच्यासाठी लढाया लढत असतात आणि पुढे येऊनदेखील लढतात. उद्धव ठाकरे माझे मित्र नेहमी माझ्यासोबत असतात. तृणमूल काँग्रेसचे खासदार साकेत गोखले हे महाराष्ट्रातील लढवय्ये आहेत. मी त्यांच्यात माझी प्रतिकृती पाहतो. कारण तेदेखील ईडीमुळे तुरुंगात होतो. शरद तांदळे यांनी हिंमत्तीचे काम केलंय. ईडीसाठी दरवाजे उघडे ठेवा. पण ईडीचं बुच मी लावून ठेवलंय. यापुढे कोणाला त्रास होणार नाही. मी शेवटचा माणूस होतो, असे संजय राऊत म्हणाले. इथे असलेल्या प्रत्येकाने मला, माझ्या कुटुंबाला नैतिक पाठबळ दिल्याचे राऊत म्हणाले.

पुस्तकावर चर्चा सुरु आहे. संपादकीय लिहितो तेव्हा चर्चा होते त्यामुळे पुस्तकाची चर्चा नाही झाली तर उपयोग काय? चर्चा तर झालीच पाहिजे. जे लिहिलंय ते सत्य आहे. माझी ओळख बाळासाहेबांमुळे झाली. सत्य आणि नितीमत्तेची कास सोडू नको, असे त्यांनी मला सांगितले.

आम्ही वाकणार नाही. काही झालं तरी जुलमी शासनव्यवस्थेच्या रणगाड्यासमोर झुकायचे नाही. हे पुस्तक मी तुरुंगात लिहायच ठरवलं तेव्हा मी देशमुखांनी सांगितलं. तिथल्या दरवाजात वाकून जाव-यावं लागत. तुमचा जगाशी संबंध पूर्ण तुटतो. दगडाच्या भींती बघायच्या आणि दिवस काढायचे. लिहिणं, वाचणं, चांगले विचार करायचे. एखादा सुटला तर त्याचे जजमेंट घेऊन अभ्यास करायचो. तुरुंगातले लोक बॅरीस्टर बनून बाहेर पडतात. ८ दिवस तुरुंगात राहिला तर पीएचडी करतो, असे राऊत म्हणाले.

आम्ही ज्या आर्थर रोड तुरुंगात होतो तिथे मी म्हटलं ससे कुठून आले. तर ते उंदीर असल्याचे सांगितले. देशमुखांनी त्यांना नाव ठेवली होती. पण आता आपण मर्यादा पाळल्या पाहिजेत, असे म्हणत त्यांनी बोलणे टाळले. सामनाचे संपादकीय यायचे, दैनिक निघायचं, लढाई सुरुच होते. माझ्यासारखा माणूस कधी खचत नाही. आत्मविश्वास महत्वाचा असल्याचे राऊत म्हणाले.

ईडीच्या कोठडीत असताना सरकारवर भयंकर टीका करणारं संपादकीय प्रसिद्ध झाले. त्यावेळी मी राज्यपालांवर लिहिले होते. त्यावेळी माझे स्टेटमेंट घ्यायला आले. मी आधीच लिहून आलो होतो. हा घाण करणार मला माहिती होतं, असे ते म्हणाले.

८० टक्के पुस्तक तुरुंगात तयार झालं. बाकीचे २० टक्के व्हायला २ वर्षे लागले. कसाबचं बराक जयंत पाटलांनी बनवलं. त्यात आम्ही राहिलो. कसे होते बराक? मीच बनवले, अशी मजेशीर आठवणदेखील पुस्तकात असल्याचे ते म्हणाले. पुस्तकात रडगाणं नाहीय. गेलो तुरुंगात आणि आलो परत. ज्याने मला पकडलं त्याला पश्चाताप झाला. आम्ही तुरुंगात जायला नाही घाबरत. देशाला अशा लोकांची गरज असल्याचे राऊत म्हणाले.

पुस्तक राजतीय आहे. ज्याला विरोधी पक्षात राहून काम करायचंय त्यांनी हे पुस्तक वाचलं पाहिजे. महाराष्ट्र गा... नाहीय. हा या पुस्तकाचा सार आहे. आजही मी कोर्टात जातो. जजसमोर उभा राहतो. हुकूमशाह कधीपर्यंत हुकूमशाही करणार? त्यालाही जमिनीत गाडलं जातं, असे राऊत म्हणाले. काही लोकांनी महाराष्ट्राचा नरक झालाय. पण याचा स्वर्ग होईल, असे ते म्हणाले.

## इंजीनियरिंगला ऍडमिशन घ्यायचय? 'ही' आहेत महाराष्ट्रातील टॉप १० इंजिनिअरिंग कॉलेजेस!

Indian Institute Of Technology म्हणजे IIT Bombay : महाराष्ट्रातील टॉप 10 कॉलेजेस मध्ये आयआयटी बॉम्बे चा पहिला नंबर लागतो. या कॉलेजची ऑल इंडिया रँकिंग 3 आहे. NIRF ने ही रँकिंग दिलेली आहे. या कॉलेजची फी ही जवळपास आठ लाख रुपये इतकी आहे, महत्वाची बाब अशी की या कॉलेजमधील सरासरी प्लेसमेंट पॅकेज हे 17.92 लाख रुपये इतके आहे. नक्कीच जर तुम्हाला मुंबईतील कॉलेजमध्ये इंजीनियरिंग चे शिक्षण घ्यायचे असेल तर ही कॉलेज तुमच्यासाठी बेस्ट राहणार आहे.

VNIT नागपूर : विश्वेश्वराय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी नागपूर हे सुद्धा महाराष्ट्रातील एक टॉप इंजिनिअरिंग कॉलेज आहे. या कॉलेजची ऑल इंडिया रँकिंग 39 आहे. या कॉलेजची फी पाच लाख रुपये एवढी आहे. जर तुम्हाला नागपूरमध्ये इंजीनियरिंगचे शिक्षण घ्यायचे असेल तर तुम्ही हे कॉलेज निवडू शकता. या कॉलेजचे कॅम्पस सुद्धा फारच छान आहे. इथे विदर्भातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेतात याशिवाय राज्यातील इतरही कानाकोपऱ्यातील विद्यार्थी या ठिकाणी शिक्षणाला प्राधान्य दाखवत आहेत.

इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई : राजधानी मुंबईतील आणखी एक बेस्ट इंजीनियरिंग कॉलेज म्हणजेच इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी. या कॉलेजची ऑल इंडिया रँकिंग 41 इतकी आहे. या कॉलेजची फी फक्त 60 हजार रुपये एवढी आहे. मुंबई शिक्षण घ्यायच असेल तर तुम्ही या कॉलेजचा सुद्धा विचार करू शकता.

कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, पुणे : हे देशातील सर्वाधिक जुन्या अभियांत्रिकी कॉलेजेसपैकी एक आहे. शिक्षणाचे माहेरघर म्हणून ख्यातनाम असणाऱ्या पुण्यातील हे कॉलेज विद्यार्थ्यांच्या आवडीचे आहे. इथेही देश-विदेशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तुम्हाला इंजीनियरिंग करायची असेल आणि तीही पुण्यातून करायची असेल तर तुम्ही या ठिकाणी ऍडमिशन घेऊ शकता.

MIT WPU : पुण्यातील कोथरूड मधील हे कॉलेज सुद्धा विद्यार्थ्यांचे आवडीचे आहे. तुम्हाला जर पुण्यातून इंजीनियरिंग करायची असेल तर तुम्ही या कॉलेजला पसंती देऊ शकता. या कॉलेजचे कॅम्पस सुद्धा फारच छान आहे.

वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट, मुंबई : VJTI, Mumbai हे सुद्धा महाराष्ट्रातील एक टॉपचे इंजीनियरिंग कॉलेज आहे. वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिट्यूट मुंबईतील एक प्रसिद्ध अभियांत्रिकी कॉलेज असून या कॉलेजमधून इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतल्यास तुम्हाला चांगल्या पगाराची नोकरी मिळू शकते.

विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी : पुण्यातील कोंढवा येथील विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी हे सुद्धा महाराष्ट्रातील एक टॉप 10 मधील इंजिनिअरिंग कॉलेज आहे. पुण्यात इंजीनियरिंग करायची असेल तर हे कॉलेज तुमच्यासाठी बेस्ट राहणार आहे.

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग : मुंबईतील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग हे सुद्धा राज्यातील एक प्रमुख अभियांत्रिकी कॉलेज आहे. महाराष्ट्रातील टॉप टेन कॉलेजमध्ये या कॉलेजचा सुद्धा समावेश होतो. देशातील अनेक विद्यार्थी या ठिकाणी इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतात.

डॉक्टर डी वाय पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी : महाराष्ट्रातील टॉप 10 इंजिनिअरिंग कॉलेजेस पैकी एक म्हणजेच डॉक्टर डी वाय पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी. पुण्यातील पिंपरी येथील हे कॉलेज इंजीनियरिंग साठी एक बेस्ट कॉलेज आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थी या ठिकाणी शिक्षण घेत आहेत. राज्याबाहेरील विद्यार्थी सुद्धा या कॉलेजला प्राधान्य दाखवतात हे विशेष.

G.H. Raisoni College Of Engineering, Nagpur : उपराजधानी नागपूर येथील हे अभियांत्रिकी कॉलेज विद्यार्थ्यांच्या पसंतीचे आहे. हे कॉलेज महाराष्ट्रातील टॉप 10 इंजिनिअरिंग कॉलेजेसपैकी एक आहे. जर तुम्ही या कॉलेजमध्ये ऍडमिशन घेतले तर तुमचे आयुष्य नक्कीच सेट होणार आहे.

पान ४ वरून पुढे...

### तलवाडा येथील....

कुठल्याही दूर व्यवहारामुळे भावना दुखावल्यास यात्रापुर्वी सर्वांशी माफी मागणे या यात्रेचा मुळ उद्देश्य(अनिवार्य) आहे. हज यात्रेला जाणा-या सय्यद मुख्तार अली, शेख सद्रोदिन, व शेख आरेफ या त्रीयोदयांना शुभेच्छा देण्यासाठी गेवराई तालुक्याचे लोकनेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडीत यांनी देखील तलवाडा येथे वेळात वेळ काढून उपस्थिति दर्शऊन शुभेच्छा दिल्या. हज यात्रा ही इस्लाम धर्मातील एक अत्यंत महत्त्वाची आणी पवित्र तीर्थयात्रा आहे, जी प्रत्येक प्रौढ महिला आणि पुरुष मुस्लिमाने आयुष्यात एकदा तरी करणे आवश्यक मानले जाते. ही यात्रा सौदी अरेबियातील मक्का शहरात (काबा शरिफ) येथे प्रतीवर्ष आयोजित केली जाते, हज यात्रेदरम्यान, यात्रेकरू विविध धार्मिक विधी आणि प्रार्थना करतात. हज यात्रेचे मुख्य घटक म्हणजे इहराम: (पेहराव) हज यात्रेसाठी विशेष प्रकारचा पांढरा, न शिवलेला कपडा परिधान करणे. तवाफ: म्हणजे काबाची परिक्रमा करणे, म्हणजे घड्याळाच्या काट्याच्या विरुद्ध दिशेने सात वेळा फिरणे. सफा आणि मरवा: या दोन पर्वतांदरम्यान धावणे, हे बेबी हजरा यांच्या प्रवासाचा एक भाग आहे, जेथे बेबी हजरा यांना हजारो वर्षा पुर्वी हज यात्रा दरम्यान (म्हणजे, इस्लाममधील एक महिला भक्त यात्रेकरू) ज्यांना पाण्याच्या शोधात खूप धावण्याची वेळ आली होती. त्या नंतर ईश्वरीय कृपेने त्या ठिकाणी पाण्याचा ऊगम झाला होता. (आशी मान्यता आहे) आज त्याच तेथील पवित्र पाण्याला जम जम आसे म्हणटल्या जाते.

अराफात: अराफात मैदानात प्रार्थना करणे आणि उपवास ठेवणे. मीना:(हे एक ठिकाण आहे जिथे यात्रेकरूंचा रहिवास आसतो) मीना येथे राहणे आणि नास्तिककतेला (शैतानाला) खडे फेकणे. या ठिकाणी गेलेल्या हज यात्रा करुंनी आपल्या अहंकारासह विविध व्याधींचा बळी देणे.

तल्बिया: म्हणजे विशेष प्रकारची प्रार्थना आणि ईश्वरीय स्तुती करने. हज यात्रेचा कालावधी अंदाजे एक ते सव्वा महिन्याचा असतो. पुर्वी हज यात्रेकरू अनेकदा पायीच प्रवास करत आसत. पण आता विविध सुख सुविधा उपलब्ध आसल्याने हज यात्रा सोपस्कर झाली आहे. हज यात्रा एक मोठे सामूहिक धार्मिक प्रथा आहे, जिथे जगभरातील लाखो मुसलमान एकत्र येतात आणि जगात सुख शांति समृद्धि लाभावी या साठी एकत्र प्रार्थना करतात. असो,हज प्रवासास निघन्यापुर्वी सय्यद मुख्तार अली, शेख सद्रोदिन फौजी, शेख आरेफ यांनी या प्रस्धिपत्राच्या माध्यमातून नागरिकांना आशी विनंती केली आहे की चिकुन कुणी आमच्या हज यात्रेस निघन्यापुर्वी आमच्या कडुन भेटीस व शमा याचनेत वंचित राहिले आसालतर ईश्वरासाठी आम्हाला रवानगी पूर्वी माफ करावे जेणे करुन आमचा प्रवास सुखकर होईल. शमस्व

### विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी...

संस्थेचे संचालक इंजि. अशोक आंधळे व विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,१०वी बोर्डाचे परीक्षा विभाग प्रमुख श्री.ठोंबरे सर,वर्गशिक्षक श्री.गिलबिले सर ,श्री.समर्थ सर,श्रीमती फलके मॅडम,श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम,श्री.कुलकर्णी सर,श्री.घोळवे सर,श्री.चोले सर सर्व विषय शिक्षक यांच्यासह विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थी,पालक व मार्गदर्शक शिक्षक-शिक्षिकांचे कौतुक व अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### ग्रामीण विद्यालयाची...

पान ४ वरून पुढे...

पातळीवर प्रथम द्वितीय क्रमांकात आलेले आहेत . तसेच विविध उपक्रम आणि स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून दरवर्षी विद्यार्थी यश संपादन करत आहेत आणि गावाचे ,पालकांचे, विद्यालयाचे नाव उंचावत आहेत . यातूनच आतापर्यंत आय.ए.एस . आय.पी.एस. इत्यादी विविध क्षेत्रात विद्यार्थी महाराष्ट्र आणि भारतभर कार्य करत आहेत .याचा गावकऱ्यांना पालकांना आणि विद्यालयाला सार्थ अभिमान आहे . वरील यशस्वी विद्यालयाचे अभिनंदन विद्यालयाचे सचिव ॲड .जगदीशरावजी शिंदे साहेब , विद्यालयाच्या प्राचार्या कदम के .के. पर्यवेक्षक रचके आर.के.सर्व शिक्षक वृंद , प्राध्यापक वर्ग ,प्रयोगशाळा परिचर व इतर कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आले व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

### 60 ते 70 हजार...

तात्काळ पंचनामा करून तातडीने मदत रावी अशी मागणी केली जात आहे. तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथील मोलमजुरी करून उपजीविका भागवणारे श्रीधर खांडवे यांचे कुटुंब असून काल दि.१३ मे रोजी सायंकाळी अचानक विजेच्या शॉटसर्किटमुळे आगीचा भडका होऊन मोठा स्फोट झाला यामध्ये स्फोट ऐवढा मोठा होता की आगीचे लोळ ची लोळ बाहेर पडत होते.यावेळी त्यांच्या घरात कोणीच नव्हते. म्हणून सुदैवाने जिवीतहानी टळली आहे. मिळेल त्या साधनाने आग विझविण्याचा प्रयत्न केला.दरम्यान, या आगीवर नियंत्रण मिळेपर्यंत घरातील फ्रिज, अन्नधान्य व जीवन उपयोगी वस्तू, कागदपत्रे जळून खाक झाल्या.रोकड ही ६० ते ७० हजार जळून खाक झाली व २ लाखापेक्षा अधिक नुकसान झाल्याचे पिडीत खांडवे कुटुंबीयांनी सांगितले पीडित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी मा.सरपंच जालिंदर नेते गायकवाड यांनी केली आहे.

पान १ वरून पुढे...

### परळी मारहाण...

मारणार नाही. मी पोलिस अधीक्षकांना फोन केला आहे. आरोपी जर गुंड प्रवृत्तीचे असतील तर त्यांच्यावर मकोका लावायला मागेपुढे बघू नका. लवकरात लवकर कठोर कारवाई करा, अशा सूचना दिल्याचं पवारांनी माध्यमांना सांगितलं. दरम्यान, अजित पवार हे सोमवारी बीड जिल्ह्याच्या दोऱ्यावर आहेत. त्यापूर्वी आरोपींवर कारवाई झाली पाहिजे, अशा सूचना त्यांनी पोलिसांना दिल्या आहेत. वाईट प्रवृत्ती ठेचून काढली पाहिजे. सगळीकडे कडक शासन राबवलं पाहिजे, या मताचा मी आहे असंही अजित पवार म्हणाले.

### '...म्हणून संजय ...

भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला.शेवटी ती केस १ कोटीवर आली. अशी अनेक नावे सांगता येतील. मला एका गोष्टीची गंमत वाटली की ही सगळी मंडळी त्रास होता तरी नमले नाहीत एकमेकांना धीर देत राहिले, असेही शरद पवार यावेळी म्हणाले. हे पुस्तक प्रसिद्ध होणार आहे हे दोन दिवसांपासून आपण पाहतोय. मला आश्चर्य वाटते सत्ताधाऱ्यांना न वाचता कसे हे पुस्तक समजले. गेली दोन दिवस सतत त्यांच्यावर टीका होत आहे. हे पुस्तक पाहिल्यानंतर समजलं की सत्तेचा गैरवापर कसा होतो याचे उत्तम लिखान महाराष्ट्राच्या जनतेसमोर मांडले आहे. देशातले विरोधक उध्वस्त करायचे असेच ठरवले होते ज्याचे परिणाम अनेकांना सहन करावे लागले. हे पुस्तक जे कोणी वाचतील त्यांनी याकडे गांभीर्याने बघायची गरज आहे.निवडणूका येतात जातात मात्र लोकव्यवस्था ही आदर्श असली पाहिजे. संजय राऊतांनी हे पुस्तक लिहून मोठे काम केले, अशा शब्दात त्यांनी कौतुक केले.

पान १ वरून पुढे...

### पेट्रोल पंपावरुन...

करण्यात आली. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बीडच्या परळी येथील पेट्रोल पंपासमोरून तरुणाचे अपहरण करण्यात आले. शिवराज हनुमान दिवटे या तरुणाचे शुक्रवारी सायंकाळी ४ वाजता काही तरुणांनी अपहरण केले. जलालपूर भागातील डोंगरपट्ट्यात असलेल्या रत्नेश्वर मंदिर परिसरात नेऊन या तरुणाला लाठ्याकाठ्या आणि बेल्टने अमानुष मारहाण करण्यात आली. सांप्रदायिक कार्यक्रमाच्या जुन्या वादावरून तरुणाला मारहाण करण्यात आली. समाधान मुंडे आणि त्याच्या इतर साथीदारांनी शिवराज दिवटे या तरुणाला ही मारहाण केली. या घटनेमुळे बीडमध्ये खळबळ उडाली. काही नागरिकांनी तरुणाला मारहाण करताना पाहिले त्यांनी आरोपींना रोखले त्यामुळे तरुणाचे प्राण वाचले. या मारहाणीमध्ये तरुण गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर सुरूवातीला परळी येथे उपचार करण्यात आले. पण पुढील उपचारासाठी त्याला अंबाजोगाईतील स्वराची रग्णालयात हलवण्यात आले. या मारहाणीचा व्हिडीओ देखील समोर आला असून तो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या प्रकरणी आता बीडचे पोलिस अध्यक्ष नवनीत कावंत यांनी थेट आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी असे आदेश संबंधित पोलिस स्टेशनला दिले आहेत. या प्रकरणी आरोपीविरोधात परळीच्या ग्रामीण पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींच्या शोधासाठी बीड पोलिसांचे विशेष दोन पथक वेगवेगळ्या भागात रवाना करण्यात आले आहेत.

### बीडमध्ये चोरट्यांनी...

दिवसांपूर्वी बसस्थानकात एकाच दिवशी दोन वृद्धांचे सोने लुटल्याचा

पान १ वरून पुढे...

प्रकार घडला होता. आता नव्याने हा प्रकार उघडकीस आल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

### दोन हजारांची लाच...

निरीक्षकांची नावे आहेत. शिकाऊ आणि कायम वाहन परवाना देण्याकरिता अधिकृत शासकीय चलनाच्या व्यतिरिक्त २०० रुपये प्रमाणे १० क्लासेसकडून एकूण दोन हजारांच्या लाचेची मागणी करण्यात आली होती. या प्रकरणी आरटीओतील तीन अधिकाऱ्यांसह खासगी एजंटला एसीबीने रंगेहात पकडले. ही कारवाई पुसद येथे आरटीओ कॅम्प परिसरात करण्यात आली. यवतमाळ येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय हे अधिकारी कार्यरत आहेत. बलदेव नारायण राठोड, रा. वाशिम असे लाच स्वीकारणाऱ्या खासगी एजंटचे नाव आहे. ड्रायव्हिंग स्कूल संचालिकेची तक्रार- लायसन्स कॅंपदरम्यान आरटीओ अधिकारी लाचेची मागणी करतात अशी तक्रार सरकार मान्य ड्रायव्हिंग स्कूलच्या एका महिला संचालिकेने ७ मे २०२५ रोजी तक्रार केली होती. ही लेखी तक्रार यवतमाळ येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती. त्यानंतर लाचलुचपत विभागाने कारवाई करत या तीनही अधिकाऱ्यांना रंगेहात पकडलं. याप्रकरणी वसंतनगर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ईडीकडून अटक...

कॉल आला. अटकेआधी माझ्या निकटवर्तीयांना त्रास दिला जात होता , धमक्या दिल्या. मी म्हणालो माझ्या मित्रावर रेड पडत आहे.. हे तुमच्या मंजुरीने होतं आहे. जर मला अटक करायची आहे तर मी दिल्लीच्या घरी आहे ही नौटंकी बंद करा, असं मी अमित शाह यांना म्हणालो. यावर

पान १ वरून पुढे...

मला काहीच माहिती नाही, असं अमित शाह म्हणाले. माझ्या कुटुंबाला त्रास का दिला जातोय?, असा सवाल संजय राऊतांनी अमित शाह यांना केल्याचा दावाही संजय राऊतांनी केला आहे.

अमित शाहांमुळे शिवसेना अन् भाजपमध्ये कटुता- संजय राऊत- अमित शाह यांच्यामुळे शिवसेना आणि भाजपमध्ये कटुता आली हे मी १०० टक्के सांगतो. आमचे भाजपचे संबंध चांगले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी याच्यासोबत चांगले संबंध होते. पण अमित शाह दिल्लीत सक्रिय झाले आणि भाजप आणि शिवसेना नात्यामध्ये कटुता निर्माण झाली. काही भाजप नेत्यांनी अमित शाह यांना सांगितलंसुद्धा तुम्ही असं करू नका... अरुण जेटली अमित शाह यांना म्हणाले होते, की महाराष्ट्रात शिवसेनेसोबत चांगले संबंध आहेत, तुम्ही असं करु नका, असा दावाही संजय राऊतांनी यावेळी केला.

### विशिष्ट नमुन्यात...

याचिकाकर्त्या उमेदवाराने उत्तर प्रदेश पोलिस भरती आणि पदोन्नती मंडळाने जाहिरात प्रसिद्ध केलेल्या पदांसाठी अर्ज केला होता. यादरम्यान त्याने भरती जाहिरातीत आवश्यक असलेल्या विशिष्ट नमुन्याऐवजी केंद्र सरकारच्या नोक-यांसाठी वेध असलेल्या ओबीसी जात प्रमाणपत्राचा वापर केला होता. तथापि, त्याआधारे उत्तर प्रदेश पोलिस नोकरभरतीत आरक्षणाचा लाभ देण्याबाबत निर्देश देण्यास सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नकार दिला. राज्य सरकारच्या नियमांचे पालन न करणारे ओबीसी प्रमाणपत्र सादर केल्यामुळे भरती प्रक्रियेतून नाकारण्यात आले. त्याविरोधात उमेदवाराने अलाहाबाद उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. मात्र उच्च न्यायालयानेही दिलासा न दिल्यामुळे उमेदवाराने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. न्यायमूर्ती दिपांकर दत्ता यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पिंपरी चिंचवडमधील ३६ बंगले जमीनदोस्त होण्याला कारणीभूत कोण ?

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडमध्ये तब्बल एक ते दीड कोटी रुपये खर्चून बांधलेली घरं डोळ्यादेखत जमिनदोस्त केली आहेत. पिंपरी चिंचवडमधील ३६ बंगलो धारकांवर ही वेळ आली आहे. इंद्रायणी नदीच्या पुररेषेत त्यांनी उभारलेले बंगले पालिकेने काही तासांतच जमीनदोस्त केले आहेत. गेल्या वर्षभरापासून सुरु असलेल्या न्यायालयीन लढ्यानंतर येथील ३०० रहिवाशी बेघर झाले आहेत. रिव्हर व्ह्यूच्या नावाखाली मनोज जरे या बिल्डरने या सर्वांची फसवणूक केली आहे. पालिकेच्या अनधिकृत विभागाची त्यांना साथ लाभल्याचा आरोप बेघर झालेल्या रहिवाशांनी केला आहे. त्यामुळं बिल्डर आणि पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई होणं अपेक्षित आहे.




पिंपरी चिंचवडमधून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीकाठी बंगला उभारायला मिळाला तर? साहजिकच असं स्वप्न अनेकांचं असतं. हेचं हेरुन पिंपरी चिंचवडमधील मनोज जरे नामक बिल्डरने रिव्हर व्हीला प्रोजेक्ट लाँच केला आहे. प्रत्यक्षात पुररेषेत अर्थात ब्लु लाईनमध्ये असणारा हा प्रोजेक्ट रेसिडेंशल झोनमध्ये असल्याची बनावट कागदपत्रे त्याने ग्राहकांना दाखवली. त्याचे दस्त ही झाले अन बंगले ही उभे राहिले. पालिकेच्या अनधिकृत विभागाच्या अधिकाऱ्यांनी पैसे खाऊन, परवानगी देऊ असं खोटं आश्वासन ही दिलं. पाणी, वीज सगळं पालिकेने पुरवलं. पण अखेर हे ३६ बंगले रहिवाश्यांच्या डोळ्यादेखत जमीनदोस्त करण्यात आले आहेत.

२०१७ साली पहिला बंगला उभारायला सुरुवात झाली. तेव्हा वकील तानाजी गंभीरेंनी ही बाब पालिकेच्या निदर्शनास आणून दिली होती. पालिकेने दुर्लक्ष केलं, म्हणून हरित लवादाकडे याविरोधात याचिका दाखल करण्यात आली, कोरोनाचा काळ असल्यानं सुनावणी रखडली. प्रत्यक्षात सुनावणी सुरु झाली तेव्हा इथं ३ बंगले उभे होते. पालिकेने सुनावणी दरम्यान २९ बंगले उभारले गेल्याची माहिती सादर केल्याचा तक्रारदाराने दावा केला होता. १ जुलै २०२४ मध्ये बंगल्याची संख्या ३६ वर पोहोचल्याचं पाहून हरित लवादाने ताशेरे ओढले अन हे बंगले ६ महिन्यात जमीनदोस्त करण्याचे आदेश पालिकेला दिले. तसेच संबंधितांकडून ५ कोटींचा दंड वसुलण्याच्या सूचना देण्यात आल्या. ३१ डिसेंबर २०२४ ला ही मुदत संपणार तेव्हाच न्यायालयाने कारवाईला स्थगिती दिली.सर्वोच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी झाली अन ५ मे २०२५ला तातडीनं या बंगल्यांवर हातोडा चालवण्याचे आदेश देण्यात आले. ६ मे ला पुढची स्थगिती देण्यास न्यायालयाने मनाई केली अन अखेर ३०० रहिवाश्यांना बेघर होण्याची वेळ आली.

रहिवाशांना अंधारात ठेवणाऱ्या बिल्डर आणि अनधिकृत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना पालिका दोषी ठरवणार का? ३६ बंगलो धारकांनी शहानिशा न करता इथं बंगले उभारले, ही चूक त्यांना नडली. पण त्यांना अंधारात ठेवणाऱ्या बिल्डर आणि अनधिकृत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना पालिका दोषी धरणार का? यावर पालिकेने उडवाउडवीची उत्तरं दिली आहेत.

मनोज जरे नेमका आहे तरी कोण?

मनोज जरे हा बांधकाम व्यावसायिक आहे. उबॉडी बिल्डिंग असोसिएशनच्या पिंपरी चिंचवड फेडरेशनच्या अध्यक्ष पदी आहे.सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील अनेक राजकीय नेत्यांशी लागेबांधे आहेत.याच संबंधांचा फायदा घेत रिव्हर व्हीला प्रोजेक्ट राबवला होता. बिल्डर मनोज जरेची पार्श्वभूमी पाहता, हे का घडलं? अन त्याला कोणाचा आशीर्वाद होता? हे उघड आहे. पण या सर्वांच्या चुकांची किंमत सर्व सामान्यांना भोगावी लागली. तेव्हा यातून धडा घ्या अन आपलं स्वप्नातलं घर उभारताना प्रत्येक गोष्टीची एकदा नव्हे तर हजारदा शहानिशा करा.

# मटका व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी लाच; जालन्यातील फौजदारासह पोलिस शिपाई अटकेत

**जालना । प्रतिनिधी**

मटका व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी २५ हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारून ती परत करणाऱ्या जालना तालुका पोलिस ठाण्यातील फोजदारासह पोलिस शिपायावर नंदुरबारच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने कारवाई केली. ही कारवाई गुरुवारी १५ मे रोजी रात्रीच्या सुमारास तालुका पोलिस ठाणे परिसरात करण्यात आली. पोउपनि परशुराम पवार, पोलिस शिपाई लक्ष्मण शिंदे अशी लाचखोरांची नावे आहेत. मटका व्यवसाय चालविणाऱ्या एकास




पोलिस शिपाई लक्ष्मण शिंदे यानी मटका चालवायचा असेल तर ३० हजार रुपये द्यावे लागतील, अशी मागणी २ एप्रिल रोजी केली होती. त्यानंतर १७ एप्रिल रोजीही परशुराम पवार यांच्या मार्फत पेशांची मागणी करण्यात आली. त्यामुळे संबंधित व्यक्तीने मुंबईतील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. तेथून नंदुरबारच्या पथकाला कारवाईबाबत निर्देश दिले होते.

पोलिस उपाधीक्षक राकेश चोधरी यांनी तक्रारीनुसार ताचेची पडताळणी वेळोवेळी केली. त्यानंतर १५ मे रोजी परशुराम पवार यांनी २५ हजार रुपये स्वीकारते आणि दरमहा तीन हजार रुपये देण्याची मागणी केली; परंतु लक्ष्मण शिंदे फोन उचलत नसल्याने ती रक्कम तक्रारदारांना परत केल्याची तक्रार तक्रारदाराने तालुका पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार फोजदार पवार व पोलिस कर्मचारी शिंदे विरुद्ध तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महायुतीतल्या दोन पक्षांचे जिल्हाप्रमुखपद सख्ख्या भावांकडे

**परभणी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या महानगर जिल्हाध्यक्षपदी शिवाजी भरोसे यांची नियुक्ती झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी आनंद भरोसे यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. या सख्ख्या भावांकडे महायुतीतल्या प्रमुख पक्षांची संघटनात्मक जबाबदारी येण्याचे हे उदाहरण राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरले आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेली भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदाची निवड प्रक्रिया नुकतीच घोषित झाली असून, येथील महानगर




जिल्हाध्यक्षपदी शिवाजी भरोसे यांची पक्षाच्या वतीने निवड करण्यात आली आहे. प्रदेश निवडणूक अधिकारी आमदार चैनसुख संचेती यांनी राज्यभरातील जिल्हाध्यक्षांच्या ज्या नियुक्त्या जाहीर केल्या. त्यात परभणी महानगर जिल्हाध्यक्षपदाची घोषणा केली आहे. परभणी ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाची निवड मात्र अद्याप पक्षाच्या वतीने घोषित करण्यात आली नाही.

भाजपच्या शहर व ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाच्या नियुक्त्या गेल्या अनेक दिवसांपासून रखडलेल्या होत्या. महानगर जिल्हाध्यक्षपदी निवड झालेले शिवाजी भरोसे हे यापूर्वी म हानगरपालिकेचे सदस्य राहिले आहेत. त्यांच्या निमित्ताने एका तरुण चेहऱ्याला पक्षाने जिल्हाध्यक्षपदाची संधी दिली आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टिकोनातून ही नियुक्ती भरोसे यांच्यासाठी नवी जबाबदारी मानली जात आहे.

शिवाजी भरोसे यांचे बंधू आनंद भरोसे यांनीही दीर्घकाळ भारतीय जनता पक्षाच्या परभणी महानगर जिल्हाध्यक्षपदाची सूत्रे सांभाळली होती. भाजपने शहर जिल्हाध्यक्षपद जाहीर केले असले, तरी अद्याप ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाची घोषणा केलेली नाही. सामाजिक समतोल राखण्यासाठी भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्षपद हे 'ओबीसी' प्रवर्गाला दिले जाईल असे संकेत आहेत. शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) जिल्हाप्रमुखपदी आनंद भरोसे यांची नियुक्तीही नुकतीच जाहीर करण्यात आली आहे.

भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना जेव्हा स्वतंत्रपणे विधानसभा निवडणूक लढले तेव्हा परभणीतून भाजपच्या वतीने आनंद भरोसे यांनी २०१४ या वर्षी निवडणूक लढवली होती.

# रायगड जिल्हा परिषद वडगाव शाळेत समर कॅम्प जोरात





● आज दुपारी मुलांना काही खेळ व पाढे यासाठी उपक्रम घेण्यात आले.यावेळी मी स्वत: उपस्थित राहून मार्गदर्शन केले.या उन्हाळी शिबिराला चांगला प्रतिसाद मिळत असून यापुढे २४ तास चालणारी शाळा म्हणून वडगाव शाळेकडे पालक पाहू इच्छितात. बहुतांश पालकांनी फोनवरून संपर्क साधत शुभेच्छा दिल्या व आभार व्यक्त केला. –सुभाष राठोड, मुख्याध्यापक शाळा,वडगाव

● मा.मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले मॅडम व मा.शिक्षणाधिकारी पुनिता गुरव मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेले हे उन्हाळी शिबीर खुपच स्तुत्य आहे. –सौ.करुणा रविंद्र ठोंबरे, अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, शाळा वडगाव.

**रायगड । प्रतिनिधी**

राजिप व प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन च्या वतीने कमाल चा कॅम्प उन्हाळी शिबिराचे जिल्हाभरातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी मा. नेहा भोसले (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे.सदर शिबिरास जिल्हाभरातून उदंड प्रतिसाद लाभत असुन पालक वर्गात सकारात्मक चर्चा आहे.रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव येथे दररोज दीड ते दोन तास शिबीर चालत असून यात भाषा,गणित या विषयांसाठी उपक्रम, खेळ, गप्पा, गाणी, पाढे असे विविध कार्यक्रम घेतले जात आहेत.

यासाठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड हे स्वतः उपस्थित राहत असून स्वयं सेविका निकिता गडगे,भाग्यश्री तांबोळी, आकांक्षा जाधव व संचिता गडगे या सुद्धा सकाळ, दुपार व सायंकाळी वेळ देऊन सर्व उपक्रम यशस्वीपणे पार पाडत उन्हाळी शिबिराला सहकार्य करत आहेत.विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाची गोडी लागत असून भाषिक मूलभूत कौशल्य व गणितीय संबोध दृढीकरण चांगल्या प्रकारे होत आहे. पालकांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. रात्रीसुद्धा मुले शिबिराला उपस्थित राहत आहेत.

# मुंब्रा येथे भारतीय बनावटीच्या विदेशी मद्य वाहतुकीवर कारवाई; ६३.९८ लाखाचा मुद्देमाल जप्त

**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे येथील राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक यांच्या भरारी पथकाने परराज्यातील भारतीय बनावटीच्या विदेशी मद्य (गोवा राज्यात निर्मित) वाहतुकीवर अमित गार्डनजवळ, मुंब्रा रोड, मुंब्रा, ता. जि. ठाणे येथे १६ मे २०२५ रोजी कारवाई केली. टेम्पो क्र. एम एच ०५ एएम १२६५ या वाहनावर संशय आल्याने वाहनावर छापा घालून गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यामध्ये परराज्यातील भारतीय बनावट विदेशी मद्याच्या (गोवा राज्यात निर्मित) एकूण ८०० बॉक्स दारूबंदी गुन्ह्याअंतर्गत जप्त केले आहे. या कारवाईमध्ये वाहनासह एकूण ६३ लाख ९८ हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे जुल्फेकार ताजअली चौधरी (वाहनचालक) यास अटक केली आहे.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ.राजेश देशमुख आयुक्त, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, कोकण विभागीय उपआयुक्त प्रदिप पवार, अधीक्षक प्रविण तांबे, उपअधीक्षक वैद्य, श्री.पोकळे, ए.डी. देशमुख यांच्या म ार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईमध्ये निरीक्षक एम.पी.धनशेट्टी, दुय्यम निरीक्षक एन.आर.महाले, आर.के. लब्दे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक बी.जी.थोरात, जवान पी.ए.म हाजन, श्रीमती एस.एस.यादव, एम.जी.शेख आदींचा सहभाग होता. या गुन्ह्याचा पुढील तपास अधिक्षक प्रविण तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक महेश प्रकाश धनशेट्टी हे करीत आहेत.

# रक्ताच्या नात्याला काळिमा! जमिनीच्या वादातून चुलत्याचे मुंडके धडावेगळे करून प्रेत फेकले विहीरीत; काका पुतण्या जेरबंद

**पाचोड । प्रतिनिधी**

रक्ताच्या नात्यात असलेल्या चुलत पुतण्यांनीच चोरटे आल्याचा बनाव करत विहीरीकडे नेऊन जमिनीच्या वादातून पासष्ट वर्षीय चुलत्याचा कोयत्याने धडावेगळे मुंडके छाटून खून करून मृतदेह विहीरीत फेकल्याप्रकरणी चिंचाळा (ता. पेठण) येथील दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आठ दिवसानंतर मोठ्या शिताफीने जेरबंद केल्याची घटना शनिवारी (ता. १७) घडली. यांतील कृत्य क्राईम पेट्रो' मालीका पाहूनच सुचल्याचे आरोपीने सांगितले. अटक करण्यात आलेल्या या दोघांना पेठणच्या न्यायलयाने पाच दिवस पोलिस कोठडी सुनावली.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या मारेकऱ्याचे नाव बाबासाहेब सखाराम ब्रम्हराक्षस (वय-३३ वर्षे) व आबासाहेब सखाराम ब्रम्हराक्षस (वय ३० वर्ष) अशी आहेत. मयत नामदेव ब्रम्हराक्षस यांनी आरोपीताचे वडील सखाराम ब्रम्हराक्षस याचेकडून काही वर्षांपूर्वी दीड एकर जमीन खरेदी केली होती. सखाराम व त्याच्या मुलाची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर त्यांनी नामदेव यास सदर जमिन परत देण्याची मागणी केली. त्यातच मयत नामदेव एक दिवस खरेदी केलेली जमिन नांगरत असतांना संबंधीत ट्रॅक्टर चालकाने आरोपीतास सदर जमिन १५ गुंठे जास्तीची असल्याचे सांगितले.

त्यामुळे त्यांनी मयताकडे मोबदला घ्या व पूर्ण जमीन द्या म्हणून मागणी लावून धरली, परंतु नामदेव हे जमिन देत नसल्याचे पाहून यांच्या मनात चिड निर्माण झाली. त्यातच मयत हे सेवानिवृत्तीनंतर जमिनीवर घर बांधून कायमचे राहायाला येणार हे पाहून बाबासाहेब व आबासाहेब यांना राग आला व त्यांना 'क्राईम पेट्रोल मालिकेम धील घटना आठवली व त्यांनी मयत नामदेव हे शेतात भावाकडेच मुक्कामास असल्याचे पाहून शुक्रवारी (ता. नऊ) पहाटे तीन वाजेच्या सुमारास चोरटे आते, 'काका तुम्ही चला असे म्हणून त्यांस झोपेतून उठवून विहीरीकडे नेते व एकाने त्यांचा दोन्ही हाताने गळा आवळला, तर दुसऱ्याने कोयत्याने मुंडके धडावेगळेकेले.



CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र

रविवार, दि.१८ मे २०२५ पान ४

## उत्तम कोंडिबा इंगोले यांचे दुःखद निधन



बीड । प्रतिनिधी

उत्तम कोंडिबा इंगोले यांचे धानोरा येथे राहत्या घरी वयाच्या ९० वर्षी वृद्धप काळाने शनिवार दिनांक १८ मे रोजी निधन झाले. उत्तम कोंडिबा इंगोले यांच्यावर त्यांच्या शेतात धानोरा येथे शनिवारी सायंकाळी सहा वाजता अंत्य संस्कार करण्यात आले.त्यांच्या पाश्चात मिठू इंगोले मूल– मुली , सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने नातेवाईक व गावातील नागरिक हळहळ व्यक्त करत होते. शनिवारी अंत्यविधीस भाजपाचे नेते नवनाथ अण्णा शिराळे, सरपंच बाळासाहेब इंगोले, दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, आदी नातेवाईक उपस्थित होते.त्यांच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वरूढ स्मारक उभारण्यासाठी नेकनूर ग्रा.पं. समोर अजय काळे यांचे आमरण उपोषण



नेकनूर । प्रतिनिधी

नेकनूर ग्रामपंचायत ने छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वरूढ स्मारक उभारण्यासाठी मागील काही वर्षापासून शिवप्रेमींनी नेकनूर ग्रामपंचायतला जागा उपलब्ध करून देण्यात यावी यासाठी यापूर्वी उपोषण केले होते परंतु नेकनूर ग्रामपंचायत ने आश्वासन देऊनही जागा उपलब्ध न करून दिल्याने शौर्य प्रतिष्ठानचे जिल्हाप्रमुख अजय काळे यांनी आमरण उपोषण सुरू केले असून जोपर्यंत नेकनूर ग्रामपंचायत स्मारकास जागा उपलब्ध करून देणार नाही तोपर्यंत उपोषण करणार असल्याचा निर्णय शिवप्रेमीनी घेतला आहे.

बीड तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेले नेकनूर या शहराची ओळख आहे यापूर्वी शिवप्रेमींनी जिल्हाधिकार्यालय या ठिकाणी नेकनूर ग्रामपंचायतने शिवस्मारकास जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी केली होती त्यावेळेस ग्रामपंचायत ने जागा उपलब्ध करून देऊ असे आश्वासन शिवप्रेमींना दिल्यामुळे मागील काही दिवसापूर्वी उपोषण स्थगित केले होते परंतु अद्यापही ग्रामपंचायतने शिवस्मारकास जागा उपलब्ध करून न दिल्याने आमरण उपोषण अजय काळे यांनी सुरू केले असून नेकनूर सह पंचक्रोशीतील शिवप्रेमींचा या उपोषणास व आंदोलनास पाठिंबा मिळत आहे तरी तात्काळ नेकनूर ग्रामपंचायत ने शिवप्रेमींच्या भावना लक्षात घेता स्मारकास जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# तलवाडा येथील नामांकित व्यक्तित्व आज पवित्र हज यात्रेला रवाना होणार

तलवाडा। प्रतिनिधी



इस्लाम धर्मातील पवित्र पर्व हज यात्रेला नुकतीच सुरवात झाली असुन तलवाडा येथील नामांकित व्यक्तित्व सय्यद मुख्तार अली(सह पत्नी,) शेख सद्रोदिन बशीरोदिन फौजी(सह पत्नी,) शेख आरेफ शेख फत्तु(सह पत्नी,) रविवार रोजी सायंकाळी ४.२७ वाजता रवाना होणार असुन या त्रीयोदयांनी ततपुर्वी अनुक्रमे गुरुवार आणी शुक्रवार रोजी आप आपल्या निवासस्थानी अल्पो आहाराचे आयोजन करत परिचित अपरिचित नातेवाईक अपेष्ट मित्र परिवार यांना आमंत्रित करुन अल्पो अहाराची मेजवानी दिली या वेळी सर्व उपस्थितांनी या त्रीयोदयांना हज यात्रेच्या सफलते साठी शुभेच्छा दिल्या. तत पश्चात या त्रीयोदयांनी उपस्थित सर्वांशी आप आपल्या कडुन कळत न कळत झालेल्या दुर व्याव्हारा संबधी शमा याचना करुन माफी मागीतली. पवित्र हज यात्रा करण्यापुर्वी कुणाच्याही

▶▶ उर्वरित पान २ वर



*माजलगाव मोठेवाडी येथील सरपंच पदभार अंगदराव खेजी यानी स्वीकारल्या नंतर त्याना शुभेच्छा देताना महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष भाऊ राऊत उपस्थित संतोष रासवे महादेव नाना आढाव मछिंद्र आढाव अशोक रासवे प्रसराम आढाव*

**महाराणी ताराबाई विद्यालयाची कु.हर्षदा नाईकवाडे ९७.00 गुण घेऊन प्रथम तर कु.साक्षी खाडे ९६.८० गुण घेऊन व्दितीय व कु. समृद्धी पाटोळे ९५.६० % गुण घेऊन १0 वी बोर्डाच्या परीक्षेत वडवणी शहरातून तृतीय**

# विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राखली दहावीच्या परीक्षेत उज्वल यशाच्या निकालाची परंपरा

वडवणी । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने फेब्रुवारी,मार्च–२०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकालात वडवणी शहरातील संस्कार शिक्षण मंडळ संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ९५.६५ % निकाल लागला असून प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी उज्वल यशाच्या निकालाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी फेब्रुवारी,मार्च –२०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार दि.१३ मे २०२५ रोजी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असून वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९५.६५ इतका लागलेला आहे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षसाठी एकूण २३० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी २२० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून कु. हर्षदा हनुमंत नाईकवाडे ९७.०० % गुण घेऊन वडवणी शहरात प्रथम आली आहे तर कु.साक्षी योगीराज खाडे ९६.८०% गुण घेऊन द्वितीय आली आहे व कु. पाटोळे समृद्धी विनोद ९५.५० गुण घेऊन वडवणी शहरातून तृतीय आली आहे तर कु.झाडे निकिता नवनाथ ९५.०० गुण घेऊन उत्तीर्ण झालेली आहे. विद्यालयातील २२ विद्यार्थी ९० % पेक्षा अधिक गुण घेऊन यश संपादन केले त्यापैकी ९६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह तर ७९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत ३८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत व ७ विद्यार्थी पास झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार श्री.केशवराव आंधळे तसेच विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय आंधळे,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रणजीत धस,▶▶ उर्वरित पान २ वर

# ग्रामीण विद्यालयाची निकालाची परंपरा कायम

नेकनूर । प्रतिनिधी



कु.शरयू वाघमारे 95.60% | चि.तन्मय शिंदे 94.00% | कु शिंदे वैष्णवी 93.00%

येथील ग्रामीण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील एस.एस.सी च्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश प्राप्त करून शाळेचे नाव उंचावले आहे . बालाघाटावरील उपक्रमशील विद्यालय म्हणून ग्रामीण विद्यालय ओळखले जाते . दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यालयाने शेकडा निकाल ९७.४३ प्राप्त करून केंद्रातून प्रथम येण्याची परंपरा कायम ठेवली आहे . या शैक्षणिक वर्षात एकूण ११७ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्यापैकी ५५ विद्यार्थी विशेष प्राविण्य , २७ विद्यार्थी प्रथम श्रेणी २२ विद्यार्थी द्वितीय श्रेणी मधे उतिर्ण झाले आहेत . यापैकी कु.वाघमारे शरयू गणेश हिने ९५.६०% घेऊन केंद्रातून आणि विद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळवला तर चि . शिंदे तन्मय तुळजीराम याने ९४% घेऊन द्वितीय ,तर कु.शिंदे वैष्णवी भारत हिने ९३% घेऊन तृतीय येण्याचा मान पटकावला .तसेच बर्डे वैष्णवी ९२, मुळे श्रद्धा ९२, कानाडे नंदिनी ९२ , कानाडे तेजस्विनी ९२ , शेख अल्फीया ९१ , काळे समर्थ ९१ ,मुळे आविष्कार ९ज , काळे अशोक ९० , कदम उत्कर्षा ९० , काळे ईशांत ९० टक्के घेवून वरील विद्यार्थी विशेष प्राविण्यात उत्तीर्ण झाले आहेत . ग्रामीण विद्यालय हे बालाघाटवर उपक्रमशील विद्यालय म्हणून कार्यरत आहे . मागील वर्षी मुख्यमंत्री माझी शाळा , सुंदर शाळा या स्पर्धेत बीड तालुक्यातून तीन लाख रुपयांच्या बक्षीस सह प्रथम येण्याचा मान या विद्यालयाने पटकावला आहे . शिवाय सी.सी. आर.टी. सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार द्वारा कु.शेख शबनम हिला आणि गुरु म्हणून कलाध्यापक मंगेश रोटे यांना राष्ट्रीय स्कॉलरशिप प्राप्त झाली आहे.ही विद्यालयाच्या अभिमानाची गोष्ट आहे.विद्यालयात सतत विविध उपक्रम राबवले जातात आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले जाते . अनुभवी शिक्षक वृंद सतत विद्यार्थ्यांच्या प्रगती कडे लक्ष देतात . त्यामुळे याही वर्षी निकालाची उज्वल परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे . शारीरिक शिक्षण , सांस्कृतिक, कला , विज्ञान , गणित ,एन.एम.एम.एस.,महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा ,भारत टॅलेंट सर्च परीक्षेत जिल्हा आणि तालुका

▶▶ उर्वरित पान २ वर

### आष्टीच्या कन्हेवडगांव मध्ये शॉटसर्किटमुळे घराला भिषण आग

# 60 ते 70 हजार रोकड व जिवनावश्यक वस्तू जळून खाक



आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील कन्हेवडगांव येथील श्रीधर खांडवे यांच्या घराला शॉर्ट सर्किटमुळे आग लागून गृहपयोगी वस्तू जळून खाक झाल्याची घटना मंगळवारी दि. १३ मे रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास घडली. घराला शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागली. आगीचा भडका उडाल्याने घरातील फ्रीज व इलेक्ट्रॉनिक वस्तू चा स्फोट झाला दरम्यान घरात कोणाही उपास्थित नसल्याने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग आटोक्यात आणली. या घटनेत घरातील सर्व संसारउपयोगी वस्तू जळून नष्ट झाल्या आहेत. आगीच्या घटनेमुळे मजूरी करुन आपले जीवन जगणाऱ्या खांडवे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. या घटनेमुळे पीडित कुटुंबाचे घर पुन्हा उभे करण्याचे मोठे प्रश्न उपस्थित झाले आहे.प्रशासनाने

▶▶ उर्वरित पान २ वर

# एसटी गुन्हेगारीचा अड्डा बनली, महिलांची छेड काढली, नंतर नातेवाईकांनी बस फोडली

बीड । प्रतिनिधी



बीडमध्यक शिवराज दिवटे या तरुणाला काल मारहाण झाली. दहा–बारा जणांच्या टोळक्याने लाठ्या–काठ्यांनी शिवराजला मारहाण केली. ही घटना ताजी असतानाच आणखी एका घटनेमुळे बीडमध्ये खळबळ उडाली आहे. सोलापूरहून बीडकडे येणाऱ्या एसटी बसमध्ये महिलांची छेड काढण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूरहून बीडकडे येणाऱ्या एसटी बसमध्ये बसलेल्या महिलांची छेड काढण्यात आली. या महिलांनी त्यांच्या नातेवाईकांना फोनवर घटलेल्या प्रकाराची माहिती दिली. बीड शहरातील बार्शी नाका परिसरात ही बस दाखल होताच नातेवाईकांनी बसच्या समोरच्या बाजूला असलेल्या काचेवर दगडफेक सुरु केली. त्यांनी एसटी बसच्या काचा फोडण्याचा प्रयत्न केला.

एसटी बसवर झालेल्या दगडफेकीमुळे मोठा गोंधळ उडाला. त्यानंतर बीड शहरात आहे त्याच ठिकाणी एसटी बसेस थांबवण्यात आल्या आहेत. बस स्थानकातील बस सेवा ठप्प झाली आहे. या संपूर्ण प्रकरणात पेड बीड पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरु झाला आहे.

सोलापूरवरुन बीडमध्ये परत असलेली एसटी बसमध्ये बसलेल्या महिलांची छेड काढण्याची माहिती समोर आली. यानंतर महिलांच्या नातेवाईकांनी गर्दी करत त्या एसटी बसवर दगडफेक केली. संतप्त नातेवाईकांना बसच्या काचा फोडण्याचा प्रयत्न केला. दगडफेकीनंतर बीडमधील बस स्थानकातील बस सेवा ठप्प झाल्याचे म्हटले जात आहे.

